
# चैतन्य सुमने

अंक ०५ २३ एप्रिल २०२४- हनुमान जयंती



हनुमान जयंतीच्या शुभदिनी हा चैतन्य सुमने या नियतकालिकाचा हा पाचवा अंक प्रसिद्ध करताना आनंद होत आहे. भक्तांची शब्द सुमने श्रींच्या चरणाशी वाहण्याची भावना लक्षात घेऊन संस्थानतर्फे एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या कल्पनेने हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यात येत आहे. यापुढेही आपले लेख chaitanya.smaran23@gmail.com या ईमेल वर 'चैतन्य सुमने साठी' अशी नोंद करून पाठवाव्या.

**– आपले विश्वस्त मंडळ, चैतन्योपासना**

## चैतन्यस्मरण स्मरणिका प्रकाशित



यावर्षी रामनवमी उत्सवानिमित्ताने गुढी पाडव्याच्या शुभ दिनी चैतन्य स्मरण ही स्मरणिका श्री महाराजांच्या चरणी अर्पण करून प्रकाशित झाली. या स्मरणिकेस अनेक मान्यवर साधक व श्रीमहाराजांच्या प्रेमाखातर सेवा करणाऱ्यांचा हातभार लागला आहे. करोना महामारीच्या काळातील अनेक भक्तांचे अनुभव, तसेच गोंदवले येथे गायन सेवा सादर करणारे नामवंत गायक यांचे लेखही या स्मरणिकेत आहेत. इतर अनेक आठवणी या रंगीत छायाचित्र स्वरूपात स्मरणिकेमध्ये आलेल्या आहेत. थोरल्या श्रीराम मंदिराला स्थापनेला तसेच जालना राम मंदिर स्थापनेलाही १२५ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त उत्सव मागील दशकात मोठ्या आनंदाने पार पडले. तसेच श्री ब्रह्मानंद महाराज पुण्यतिथी शतमान उत्सव, श्री गोपाल कृष्ण मंदिर शतकपूर्ती सोहळा हे ही या दरम्यान झाला त्याचा वृत्तांतही आपल्याला या स्मरणिकेत वाचता येईल. गोंदवले येथे मागील जवळपास ११० वर्षांच्या इतिहासाच्या धावत्या आढाव्या सह मागील दशकातील गोंदवले परिसरात झालेल्या सुधारणा आणि त्यांची माहिती ही स्मरणिकेत आपल्याला बघायला मिळेल. तसेच नजीकच्या भूतकाळात कालवश झालेल्या श्री महाराजांचे प्रेमात असलेल्या भक्तांचे उल्लेखही स्मरणिकेत केले आहेत. येथे समर्पित पणे सेवा करणाऱ्या काही सेवेकऱ्यांचे प्रातिनिधिक लेखही आपल्याला वाचायला मिळतील.

असा हा लेख व फोटो यांनी अत्यंत अतिशय सुंदर सजलेला अंक संग्राह्य झाला आहे व गोंदवले येथील ग्रंथविभागात विक्रीसाठी उपलब्ध ही करण्यातआलाआहे. पृष्ठ मर्यादेमुळे यामुद्रित अंकात प्रकशित होऊ न शकलेले लेख वेळोवेळी या चैतन्य सुमने च्या अंकात प्रसिद्ध होतील.




## १९-४-१९५६ रोजी रामनवमीला दुपारी १:३० चे सुमारास झालेल्या श्रीमहाराजांच्या [वाणी अवतार] प्रवचनातील काही भाग



आपण सर्वजण जन्माला येतो आणि परमात्मा ही आज जन्माला आला आहे असे म्हणतात. पण या दोघांच्या जन्माला येण्यामध्ये फरक आहे. आपल्याला जन्माला यावे लागते - येणे न येणे आपल्या हातात नाही. परमात्मा स्वेच्छेने - स्वखुशीने जन्माला येतो. आपण आपल्या पूर्व कर्माने बांधलेले असतो व प्रारब्ध आपणास जन्म घ्यावयांस लावते. परमात्मा सर्व कर्माच्या पलीकडे आहे म्हणून जन्म घेणें किंवा जन्माला येणे हा भाग दोघांना जरी सारखा असला तरी दोहोंचा जन्म घेण्यात महदंतर आहे. हा परमात्म्याचा जन्म दरवर्षी अनेक ठिकाणी साजरा केला जातो. काही वेळेस, जन्म वर्षातून दोन वेळा साजरा होतो [पंचांगात बदल असेल त्याप्रमाणे] व काही वेळेस निरनिराळ्या वेळी जन्म करण्यात येतो. याचा अर्थ आपण परमात्म्याला आपल्याला पाहिजे त्यावेळी जन्माला आणू शकतो. याचे कारण तो सदासर्वदा आहेच. तो कधी कोणत्याही क्षणाला नव्हता असे म्हणता येत नाही. मग असे विचारावेसे वाटते की त्या जन्माने आपल्या बाबतीत काय फरक होतो. आपण आपल्यालाच विचारून पाहिले पाहिजे की आपण जन्म साजरा केल्यानंतर पूर्वी होतो त्यापेक्षा काही निराळे झालो की त्यानंतरही होतो तसेच राहिलो आहोत. जर आपल्यात काही बदल झाला नसेल तर हा सर्व खटाटोप म्हणजे एक नुसता करमणुकीचा कार्यक्रम झाला. त्यापेक्षा त्याला अधिक

# प्रवचन परिमळ




किंमत राहणार नाही. खरे पाहिले असता जन्मानंतर – जन्म केल्याचे फळ म्हणून – आपणात आमूलाग्र फरक पडला पाहिजे.

परमात्मा आला असे म्हणतो ते खरोखर आल्याचा विश्वास वा परिणाम दाखवत नाही. लहान मूल रस्त्याने एकटे जात असता त्याला आपला बाप दृष्टीस पडला म्हणजे जसा सुरक्षितपणा – जशी निश्चिंतता व निर्भयता वाटते तशी परमात्मा जन्माला आल्यावर आमची भिती, काळजी, असमाधान, दुःख एकदम नाहीशी झाली पाहिजेत परंतु प्रत्यक्षात पाहिले तर तसे होताना दिसत नाही. आमच्या या सर्व गोष्टी जवळजवळ आहे तशाच कायम राहतात. म्हणून प्रभूच्या जन्माचा खरा अर्थ – रहस्य आम्हाला समजत नाही कारण त्याकरिता लागणारी श्रद्धा आमचे जवळ नाही. आम्हाला परमेश्वराच्या आगमनापासून जर खरा फायदा व्हायचा असेल तर ही श्रद्धाच उपयोगी येईल. ती सदाचार व नामस्मरण ह्यातून निर्माण होते. सदाचार हा परमार्थाचा पाया आहे पण त्याला अखंड नामस्मरणाची जोड पाहिजे. परमेश्वर प्राप्ती करता जी अनेक साधने सांगितली आहेत ती सर्व एका नामात आहेत.

जन्माला येण्याचे वेळी किंवा आल्याचे वेळी प्रभू विशेष आनंदात आणि देण्याचे भरात असतो आणि आपण काय मागू ते तो आपणास देईल. म्हणून या शुभ प्रसंगी त्याच्याजवळ त्याचे नामाचे प्रेम फक्त मागू आणि ते तो खात्रीने देईल. त्या वाचून दुसरे काही आपण मागू नये. या एका ध्येयाच्या मागे जाण्याचा आपण आज निश्चय करूया आणि मगच आपण केलेल्या जन्मोत्सवाचे खरे सार्थक होईल.

संकलन: डॉ. वा. रा. अंतरकर



**३ एप्रिल ही पू. श्री तात्यासाहेब केतकर यांची इंग्रजी तारखेने पुण्यतिथी! त्यानिमित्ताने त्यांच्या चरणी शब्द सुमनांजली.**

श्री.अरविंद काळे

तुम्हा बहुत शोभते खचित नाम तात्या असे ।
असंख्य जन तातसे सदय प्रेम चित्ती वसे ।
मुखीं तुमचीया अहा गुरुसुधोक्ती गंगा झरे ।
जिला सतत सेवूनी मलीनता जगाची हरे ।।

हे वर्णन आहे श्रीयुत रामचंद्र चिंतामण उर्फ तात्यासाहेब केतकर यांचे. श्री तात्यासाहेब हे भाऊसाहेब आणि सौ बाई केतकर यांचे चिरंजीव श्री. भाऊसाहेब केतकर हे श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या शिष्योत्तमांपैकी!

श्री. भाऊसाहेब निवृत्तीनंतर श्रीगोंदवले येथे श्रीमहाराजांचे जवळ येऊन राहिले. आणि महाराजांच्या आज्ञेनुसार त्यांच्या पश्चात १२ वर्षे गोंदवल्यास राहिले. भाऊसाहेबांचे चिरंजीव श्री. तात्यासाहेब हे शिक्षणासाठी बाहेरगांवी राहिले. एका गुरुपौर्णिमेस तात्यासाहेब गोंदवल्यास गेले असता श्रीमहाराज त्यांना म्हणाले; "मी डोक्यावर हात ठेवला तर जगातील सर्व विद्या तुला येईल." अशाच एका प्रसंगी श्रीमहाराजांनी, श्री तात्यासाहेबांच्या अंगावर उपरणे घातले. तेव्हा तिथे हजर असलेल्या कांही स्त्रिया हसल्या. त्यावेळी श्रीमहाराज त्यांना म्हणाले; "हसू नका, हा पुढे साधु होईल."

त्याकाळच्या पद्धतीनुसार वयाच्या अठराव्या वर्षी तात्यासाहेबांचा विवाह सांगलीतील प्रतिष्ठित सरकारी अधिकारी श्रीयुत गोखले यांची कन्या चि. अंबुताई हिच्याशी झाला. मुलीची पसंती श्री महाराजांनी केली. श्रीमहाराजांनी तिच्या कपाळावरून गंध लावतात तसा अंगठा फिरवला आणि म्हणाले; "हिच्या हातून भरपूर अन्नदान होईल. हिला करून घ्यावे." सन १९०४ साली हे लग्न श्री गोंदवल्यास झाले. गोरज मुहुर्त होता, पण ऐन लग्नाच्या वेळी श्रीमहाराज खोलीत जाऊन निजले. इकडे मुहूर्त टळून गेला. आणि रात्री उशीरा श्रीमहाराज खोलीच्या बाहेर आले. आणि "मला का उठवले नाही" म्हणाले. लग्नघाई सुरु झाली. नवऱ्यामुलास श्रीमहाराजांच्या बताशा घोड्यावर बसविले, श्रीमहाराजांनी स्वतः घोड्यास धरले होते. आणि वाजत गाजत नवऱ्या मुलास लग्न मंडपात आणले. अखेर रात्री १२ नंतर हे लग्न लागले. नंतर कळले की लग्न लागले तो सर्वात उत्तम मुहूर्त होता. अशा तऱ्हेने चि. अंबुताई सौ. यमुनाबाई केतकर झाल्या.

लग्नसोहळा पार पडल्यावर गोखले कुटुंब आपल्या गावी जाण्यास निघाले त्यावेळी त्यांच्या

विचार सुमने

मुलीच्या (अंबूच्या) डोळ्यात पाणी आले. तेव्हा मुलीचे वडील तिला म्हणाले; "आंबे! तुला गोकुळात दिली आहे. कधी डोळ्यातून पाणी काढू नकोस." त्यानंतर श्री तात्यासाहेब यांनी मिलिटरी अकाउंट्स मध्ये नोकरी धरली आणि बदलीच्या निमित्ताने त्यांना पुणे, नाशिक, मुंबई अशा ठिकाणी वास्तव्य करावे लागले. शेवटी मुंबईत मालाड कृष्णबाग येथे आपले आईवडील आणि कुटुंबियांसह कायमचे राहिले. तात्यासाहेब आणि सौ. ताई (यमुनाताई) यांची ४ मुले जगली. ३ मुली व १ मुलगा. हे सर्व महाराजांचे अनुग्रहित होते. त्यापूर्वी एका गुरुपौर्णिमेस श्रीगोंदवल्यास गेले असता श्रीमहाराजांनी तात्यासाहेब आणि त्यांच्या पत्नीस अनुग्रह दिला. व श्रीरामरायाची मानसपूजा करण्यास सांगितले. त्यावेळी खोलीच्या दरवाजापाशी श्रीब्रह्मानंदमहाराज उभे होते. त्यांनी तात्यासाहेबांस विचारले की, "श्रीमहाराज काय म्हणाले?" तेव्हा तात्यासाहेब म्हणाले की, "त्यांनी श्रीरामरायाची मानसपूजा करण्यास सांगितले" त्यावर श्रीब्रह्मानंदमहाराज म्हणाले की, "श्रीमहाराजांच्या दृष्टीने ते बरोबरच आहे पण आपण श्रीमहाराजांचीच मानसपूजा करावी." आणि ते तात्यासाहेबांनी जन्मभर पाळले.

> **तात्यासाहेब स्वतः "आपण महाराजांच्या घरात राहतो" असे म्हणत. त्यामुळे येणा जाणारे श्रीमहाराजांकडे येतात अशी त्यांची ठाम श्रद्धा असल्याने तात्यासाहेबांना अशा पाहुण्यांचा कधीही त्रास झाला नाही. उलट अशा व्यक्तींना मदत करणे ही श्रीमहाराजांची सेवाच होय असे त्यांना वाटे.**

तात्यासाहेब आपल्या आईवडिलांसह, मुलाबाळांसह मालाडच्या बंगल्यात राहिले. त्यांचे आपल्या आईवडिलांवर, मुले व इतर नातेवाईकांवर खूप प्रेम होते. त्याकाळी मुले बहुतेक आई वडिलांना घाबरत व जबरदस्त शिक्षेची त्यांना सदैव भीती असे. अशा काळात तात्यासाहेब आपल्या मुलांशी (३ मुली १ मुलगा) अत्यंत प्रेमाने व मोकळेपणाने वागत. एकत्र कुटंब असले तरी त्यांचे घरी प्रसन्न वातावरण असे. मोठ्याने बोलणे, आरडाओरड, भांडण, हुकुम सोडणे, टाकून बोलणे, अपमान करणे असले प्रकार घरात कधीही पहावयास मिळत नसत. घरात इतर नातेवाईक पाहुणे, श्रीमहाराजांची माणसे यांची रोज सतत ये जा असे. त्या सर्वांशी तात्यासाहेब व त्यांचे कुटुंबीय अत्यंत आदराने व प्रेमाने वागत. मुंबईतील वास्तव्यामुळे तिथे पाहुण्यांचीही सतत ये जा असे. कोणी नोकरीसाठी, कोणी औषधोपचारासाठी किंवा इतर कुठे राहण्याची सोय नाही म्हणून ती. तात्यासाहेबांच्या किंवा श्रीमहाराजांच्या सान्निध्यात राहण्यासाठी म्हणून तात्यासाहेबांच्या घरी राहत. तात्यासाहेब स्वतः "आपण श्रीमहाराजांच्या घरात राहतो" असे म्हणत. त्यामुळे येणारे जाणारे श्रीमहाराजांकडे येतात अशी त्यांची ठाम श्रद्धा असल्याने तात्यासाहेबांना अशा पाहुण्यांचा कधीही त्रास झाला नाही. उलट अशा व्यक्तींना मदत करणे ही श्रीमहाराजांची सेवाच होय असे त्यांना वाटे.

घर मोठे असल्याने नातेवाईक व संप्रदायातील लोकांचे वैयक्तिक समारंभ लग्न, मुंजी, बारशी, बाळंतपणे, आजारपणे मालाडच्या बंगल्यात होत. सौ. ताई तर कृष्णबागेतील घराला 'समर्थ कार्यालय' म्हणत. एकदा सौ. ताई श्रीमहाराजांसमोर बसून जप करीत होत्या त्यावेळी आजूबाजूला काही माणसे जमिनीची मोजमापे घेत होती. ते पाहून ती. ताईनी त्यांच्या चिरंजीवास (दिनकरराव) विचारले की, "ही माणसे काय करीत आहेत?" तेव्हा त्यांनी सांगितले की, "शेठजी ही प्रॉपर्टी विकावयास निघाला आहे." तेव्हा ताई म्हणाल्या; "तू का घेत नाहीस हे घर?" त्यांनी

ते तात्यासाहेबांना सांगितले तेव्हा तात्यासाहेब "आपण श्रीमहाराजांना विचारू" म्हणाले. त्याप्रमाणे हे श्रीमहाराजांच्या कानावर घातले. श्रीमहाराजांनी ती. ताईना विचारले की, "तुम्हाला हे घर का विकत घ्यावेसे वाटते?" तेव्हा त्या म्हणाल्या की, "ह्या मुंबईत माणसे इतकी घाई गडबडीत असतात की दोन घटका शांतपणे बसून नामस्मरण करावे म्हटले तर अशी जागा नाही म्हणून वाटले की अशी एक जागा असावी."त्यावेळी श्रीमहाराज म्हणाले की, "हा उद्देश असेल तर जागा विकत घ्यावी." तेव्हा दिनकररावांनी धाडस करून, खूप अडचणी सोसून ती जागा विकत घेतली. आणि त्यामुळे कोणाही साधकास तेथे बसून नामस्मरण करण्यास जागा झाली. श्रीभाऊसाहेब शेवटपर्यंत तात्यासाहेबांसमवेत राहिले. त्यांना ९२ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. त्यांची वृत्ती साधुवत होती. त्यांनी श्रीमहाराजांपाशी आपल्या भावना केंद्रित केल्या होत्या.

श्रीमहाराज सांगतील तेच आचरणात आणायचे. ते देवाला नमस्कार करताना देखील "महाराज" म्हणून करीत. त्यांनी तात्यासाहेबांना सांगितले होते की, "श्रीमहाराजांना सोडू नये." आणि गुरुपौर्णिमेचा उत्सव दरवर्षी करावा. त्याप्रमाणे मालाडला दरवर्षी गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा होतो. तात्यासाहेबांच्या पश्चात दिड वर्षाने त्यांच्या पत्नीचे निधन झाले आणि सर्व जबाबदारी श्री दिनकरराव व त्यांच्या पत्नी निर्मलाताई यांचेवर आली. ती त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

तात्यासाहेब अत्यंत देखणे, गोरेपान, सुदृढ शरीरयष्टीचे व उंचपुरे होते. त्यांचा चेहरा अत्यंत प्रसन्न व तेजस्वी होता. चेहऱ्यावर सात्विक हास्य असे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्वाची सर्वांवर छाप पडत असे. तात्यासाहेबांची दिनचर्या अशी असे. सकाळी पाचचे सुमारास उठणे, गादिवर बसूनच थोडा जप करणे. ६ वाजता भूपाळ्या व काकड आरती होई. त्यानंतर श्रीमहाराजांना लोणीसाखरेचा व चहाचा नेवैद्य होई. हे श्री वामनराव करीत. चहा फार गरम नाही ना हे ते आधी पहात नंतर श्रीमहाराजांपुढे करीत. त्यानंतर सर्वांसमवेत चहापान होई. नंतर अर्धा ते पाउणतास सामुदायिक जप होई. त्यानंतर सर्वांची विचारपूस होई. दहानंतर आंघोळ, संध्या, श्रीमहाराजांची मानसपूजा, श्रीमहाराजांना तुळशीपत्र वाहणे. बारा नंतर सर्वांबरोबर भोजन होई. अशा वेळी कुणी पाहुणा आला तर तात्यासाहेब स्वतः जातीने त्याला हेवे नको ते पहात. पंगतीमध्ये जेवतांना ते थोडा आग्रह करत. शक्य असल्यास पाहुण्यांच्या आवडीचा पदार्थ वाढण्यास सांगत. स्वतः जेवताना चवीने जेवीत. आवश्यक तेवढेच घेत. ताटात कधीही टाकत नसत. व पान स्वच्छ असे. व अन्नाचा आदर केला जाई. त्यामुळे जेवण आनंदात होई. व श्रीमहाराजांचा प्रसाद ग्रहण केल्याचे समाधान सर्वांस होई. सोवळ्याने केलेला स्वयंपाक श्रीमहाराजांना नेवैद्य दाखवून नंतर सगळ्यांना वाढला जाई.

जेवणानंतर थोडी वामकुक्षी. दुपारचा चहा, पत्रव्यवहार पाहणे, आलेली पत्रे श्रीमहाराजांना वाचून दाखविणे आणि त्यांच्या आज्ञेनुसार उत्तर पाठवणे. पूर्वी हे पत्रलेखन श्री तात्यासाहेब स्वतः करीत त्यात सर्वांची चौकशी केली जाई. व श्रीमहाराजांचा निरोप आणि आशीर्वाद नक्कीच असे. नंतर नंतर त्यांचे पत्रलेखन श्री आबा जोशी त्यांच्या सुंदर हस्ताक्षरात करीत. संध्याकाळी आणि दिवसभरात कुणी श्रीमहाराजांना भेटण्यास आले तर त्यांची श्रीमहाराजांशी भेट करवून देत. रात्री हलका आहार घेत. त्यानंतर भजन व आरती होऊन श्रीमहाराज सर्वांना भेटत, विचारपूस करीत, तसेच मार्गदर्शन करीत. रोज श्रीमहाराज व ती. रा. बेलसरे बाबा यांचे संभाषण होई. ती. बाबा प्रत्येक गोष्ट महाराजांच्या कानी घालत. त्यात कधी अध्यात्मासंबंधी, तत्त्वज्ञानासंबंधी शंका असत.

त्याचे श्रीमहाराज निरसन करीत. तसेच दिवसभरातील घडामोडी श्रींच्या कानावर घातल्या जात व श्रींचा सल्ला घेतला जाई. नंतर शेजारती होऊन निजानीज होई. त्यावेळी ती. तात्यासाहेब स्वतः सर्वांची अंथरूण पांघरुणाची सोय झाली आहे ना हे पाहत. हे सर्व होत असताना प्रत्येकवेळी येता जाताना ती. तात्यासाहेब श्रीमहाराजांच्या तसबिरीसमोर उभे राहून अत्यंत मनापासून व शरणभावाने 'महाराज मायबाप' असे म्हणत. ती. तात्यासाहेबांची प्रत्येक कृती ही सुंदर असे. नीटनेटकेपणा, स्वच्छता व वेळच्यावेळी गोष्टी करणे ह्याबद्दल ते स्वतः शिस्त पाळीत. दैनंदिनी लिहिणे, रोजचा खर्च लिहिणे, पत्रांना आवर्जून उत्तर देणे, औषधोपचार ठरल्यावेळी करणे हे सर्व त्यांच्या स्वभावाचा भाग असे. त्यामध्ये चालढकल करणे, कंटाळा करणे हे त्यांच्या बाबतीत अशक्यच होते.

प्रेमळ दृष्टी, निर्व्याज मन, वागण्यातील गोडवा, नि:स्वार्थीपणा, आपुलकी, स्नेह ह्या सगळ्याचा प्रत्यक्ष अनुभव तात्यांच्या वागण्यात येत असे. या सर्वांचा भेटायला येणाऱ्यांवर विशेष परिणाम होई. तात्यासाहेबांच्या वागण्यात अजिबात कृत्रिमपणा नसे त्यामुळे पहिल्याच भेटीत लोक त्यांच्याकडे आकर्षित होत. तात्यासाहेबांची होती तशी प्रेमळ दृष्टी फक्त साधूसंतांनाच असते त्यामुळे त्यांना भेटणारी व्यक्ती भारावून जाई व हळूहळू त्याच्या कुटुंबातील एक होऊन जाई.

स्वतः तात्यासाहेब संकोची स्वभावाचे होते तसेच मितभाषी व मृदुभाषी होते. ते कुणाकडे काहीही मागत नसत. 'दाता एक रघुनंदन' ही एक ठाम श्रद्धा असल्यामुळे त्यांनी कुणाकडे मदत मागितली नाही. आणि तशी त्यांना गरज पडत नसे कारण त्यांचे पाठीराखे स्वतः श्रीमहाराज होते. ह्या बाबतीत सौ. ताई म्हणत 'जे जे वांछित ते ते सारे पुरवितात संत' म्हणजेच श्रीमहाराज.

तात्यांना खेळाची आवड होती. ते स्वतः बुद्धिबळ, पत्ते, रिंग, टेनिस, क्रिकेट असे खेळ खेळत. पण क्रिकेट, पोहणे वगैरे बाहेरगावी गेल्यावर शक्य असे. घरात तात्यासाहेबांचा वावर अगदी हळुवारपणे असे. सौजन्यपूर्ण व्यक्तिमत्व होते. आवाज चढवून न बोलणे, दुसऱ्याचे मन न दुखावणे कुणाचाही अपमान न करणे हा तर त्यांचा स्थायीभाव. ह्यात त्यांची उघड उघड भूमिका अशी होती की, "त्यांच्या संपर्कात येणारी सर्व माणसे श्रीमहाराजांची आहेत तर त्यांना बोलण्याचा रागावण्याचा मला काय हक्क?" एकदा एक तरुण मुलगा गोंदवल्यास आला होता. त्याचे वागणे अस्थिर मनोवृत्तीचे होते त्यामुळे त्याची इतर लोक चेष्टा करीत. त्यात तात्यासाहेबांच्या स्नेहातील एक व्यक्ती भाग घेत असे. त्या व्यक्तीला एकटा असताना तात्यासाहेब म्हणाले की, "इथे गोंदवल्यात जी व्यक्ती येते त्या व्यक्तीचे आतील पारमार्थिक तयारी काय आहे हे त्या व्यक्तीच्या बाह्य वर्तनावरून कळणार नाही, म्हणून आपण त्याची चेष्टा करू नये." ह्यावरून तात्यासाहेबांची इतरांकडे बघण्याची दृष्टी कशी होती हे कळते.

तात्यासाहेब स्वतः कधी कोणाला उपदेश करीत नसत. अगदी जवळच्या माणसाला ते सांगत की, "आपल्या माणसाने कसे वागावे? तर श्रीमहाराजांना आवडेल असे वागावे." तसेच "सर्वांनी मिळून मजा करावी एकट्या दुकटयाने करू नये. सर्वांनी एकमेकाशी प्रेमाने वागावे. आई वडिलांच्या आज्ञेत रहावे व त्यांना अजिबात दुखवू नये. वाद झाल्यास खुबीने, सामोपचाराने मिटवावा." स्वतः तात्यासाहेब तसेच वागल्यामुळे त्यांना ते सांगण्याचा अधिकार होता. श्रीमहाराजांना भेटण्यास दूरदूरुन माणसे येत. वेळीअवेळी येत. अशा व्यक्तीचा तात्यांनी कधीही अनादर केला नाही. कंटाळा केला नाही. ते श्रीमहाराजांशी त्याची भेट घडवून देत. स्वतः सल्ला देत नसत. "आपण श्रीमहाराजांना विचारू" म्हणत. "श्रीमहाराजांच्या बोलण्याचा सरळ अर्थ घ्यावा.

त्यात आपले मत घालून वेगळा अर्थ आपल्या सोयीप्रमाणे काढू नये” असे तात्यासाहेब म्हणत.

काही वेळा एखादी व्यक्ती अत्यंत चुकीचे वागत असेल तर ‘श्रीरामरायानेच त्याला सांभाळावे.’ असे म्हणत. निंदा करणे नाही. तात्यासाहेबांचे एक ‘inner circle’ होते त्यात श्री बाबा बेलसरे, श्री बाबा काशीकर, श्री हरिभाऊ फाटक, श्री तारदाळकर, श्री खांडेकर, श्री तांबेकाका, डी. आर. जोशी, डी. जी. जोशी, डॉ. पाथरकर, डॉ. खरे, असे समवयस्क होते. आणि श्री भगवंतराव जामखेडकर, श्री हरिभाऊ फडके, श्री. नारायणराव खळदकर, श्री वर्तक, श्री बापूसाहेब देशपांडे, श्री आबा जोशी, डॉ. वैद्य, श्री तापस, डॉ. दफ्तरदार, ही त्यातल्या त्यात पुढची पिढी. तसेच मुंबईबाहेरची जवळची माणसे म्हणजे, श्री रा. भीमराव गाडगुळी, इनामदार, नागप्पा, श्री हुच्चुराव, श्री दामले तात्या आणि त्यांचे कुटुंबीय, श्री रघुनाथराव घाणेकर, मनोहर बंधू, श्री बोंद्रे, तसेच श्री पंडितराव गोखले, श्री राजाभाऊ साठे ही नातेवाईक मंडळी तात्यासाहेबांच्या विशेष जवळची होती.



ती. तात्यासाहेबांच्या जीवनात त्यांच्या पत्नीचे अनन्यसाधारण महत्व होते. दोघांचे ध्येय एकच होते. श्री महाराजांना भेटण्यास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे स्वागत श्रीमहाराजांना अभिप्रेत अशा आपुलकीने झालेच पाहिजे. हा दोघांचाही निश्चय त्यामुळे त्यात सहसा कमी जास्त होत नसे. अशा येणाऱ्या व्यक्ती काही कामापुरती येत हे माहित असूनही त्यांना निराश करणे नाही. त्यासाठी सौ ताई अहोरात्र झटत. एकदा श्री. डोंगरे महाराज श्रींच्या दर्शनासाठी आपल्या शिष्यगणांसह आले होते. त्यावेळी श्रींनी त्यांना रामाचा प्रसाद घेऊन (जेवून) जाण्यास सांगितले. त्यावेळी श्री. डोंगरे महाराज स्वतःचे जेवण स्वतः बनवीत. परंतु श्रींच्या आज्ञेनुसार जेवून जाण्यास तयार झाले. त्यांनी फक्त एक विनंती केली की, “तात्यासाहेबांच्या मंडळी, स्वतः स्वयंपाक करणार असतील तर ते जेवून जातील.” हे ऐकताच सौ. ताई आनंदाने उठल्या व त्यांनी स्वतः सोवळे नेसून स्वयंपाक केला आणि डोंगरे महाराज त्यांच्या शिष्यांसह जेवून गेले.

तात्यासाहेबांना श्रींनी एक जपसंख्या नेमून दिली होती. तेव्हा नोकरी, गाडीचा प्रवास, येणारे जाणारे, नेहमीचे तसेच प्रासंगिक कार्यक्रम सांभाळून ती. तात्यासाहेबांना जपसंख्या पूर्ण करावीच लागे. त्यात झोपेची फार आबाळ होई. परंतु ठराविक जपसंख्या झाल्याखेरीज तात्यासाहेब झोपले नाहीत. त्यावेळी तात्यासाहेब पेटी घेऊन बसत. त्या पेटीत श्रीमहाराजांचा फोटो आहे व दुसऱ्या भागात काचेखाली अक्षरे आहेत त्या काचेवर तांब्याचा पैसा ठेऊन त्यावर उजव्या हाताच्या करंगळीशेजारील दोन बोटे ठेऊन तात्यासाहेब श्रीमहाराजांच्या फोटोकडे पाहत ध्यानमग्न होत. थोड्याच वेळात तो पैसा व त्यावरील बोटे भराभर फिरू लागत. नंतर एक क्षण थांबत आणि “आशीर्वाद” असे शब्द येत. भेटायला आलेले लोक त्यांना नमस्कार करीत. श्रीमहाराज त्यांचे

विचार सुमने

कुशल विचारीत. काही शंका अथवा अडचणी असतील तर त्यांचे निराकरण श्रीमहाराज करत. त्यांना योग्य तो सल्ला देत. "सर्वांनी थोडे तरी नामस्मरण करावे. नीती नियमाने वागावे. प्रेमाने राहावे. ज्यांच्या पोटी आपण जन्माला आलो त्यांना कधी दुखवू नये. आपला प्रपंच, आपले कुटुंब, नातेवाईक मुले ही देवाने दिलेली असून त्यात आपली कर्तव्ये पार पाडावीत. कष्टाला कमी लेखू नये. आणि मिळणारे यश किंवा अपयश त्याचे इच्छेमुळे आहे असे समजून आनंदात रहावे" असा त्यांचा उपदेश असे. कधी कधी ती. बाबा बेलसरे अध्यात्मातील शंका, अडचणी विचारीत. त्यांचे समाधान होईपर्यंत चर्चा चाले. कधी आलेल्या पत्रांचे वाचन होई. त्यांना उत्तर काय द्यावे हे सांगत. कधी कधी उत्तरे गद्यकाव्यात गुंफलेली असत.

त्यानंतर श्रीमहाराज सर्वांची खुशाली विचारून सर्वांना आशीर्वाद देऊन "आनंदात संसार करा सर्वांशी प्रेमाने वागा." असे सांगून व शेवटी "या! या बरं बाळ!" असे म्हणून थांबत. त्यावेळी भेटण्यास आलेल्या प्रत्येकाचे समाधान होई. आणि विशेष म्हणजे ते व्यवहारी मार्गाने जाण्यास सांगत. आजाऱ्याने डॉक्टरच्या म्हणण्यानुसार वागावे. औषध वेळेवर घ्यावे. मुलांनी आईवडिलांच्या आज्ञेत रहावे. ऑफिसात साहेबांशी आदराने व खुबीने वागावे. पुरुषाने आपल्या पत्नीवर प्रेम करावे. स्त्रीयांनी आपल्या संसारात दक्ष रहावे. सासू-सासरे पती व मुलांचे प्रेमाने करावे असे ते सांगत. मुख्य म्हणजे आनंदात रहावे असा उपदेश करीत.

**तीर्थरूप तात्यासाहेबांना जाऊन ५० ते ५५ वर्षे झाली. अजूनही त्यांची पद्मासन घातलेली, ताठ कणा असलेली, खांदे न झुकलेली शांत व प्रसन्न ध्यानमुद्रा डोळ्यासमोर येते आणि मन प्रसन्न होऊन जाते.**

इथे एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते ती म्हणजे जरी श्रीमहाराज, ती. तात्यासाहेबांच्या मुखातून उपदेश करीत. तरी ती. तात्यासाहेब त्याचे भांडवल करीत नसत. ह्याबाबतीत ते अत्यंत संकोची असत. ते म्हणत, "ह्या सर्वात श्रीमहाराजांचे महत्व आहे." ते स्वतःकडे अजिबात श्रेय घेत नसत. इतर वेळी म्हणजे पेटीजवळ बसलेले नसताना कधीही त्यांनी स्वतःला हार घालून घेतला नाही. पूजा करू दिली नाही. लोकांना अनुग्रह दिला नाही. त्याबाबतीत ते स्वतःला तात्याच समजत.

ती. तात्यासाहेबांचे प्रोस्टेटचे ऑपरेशन दादरला करमरकरांचे हॉस्पिटल मध्ये झाले. २ एप्रिल रोजी त्यांना भेटायला नाशिकची मंडळी येऊन गेली. त्यावेळी तात्यासाहेबांना अगदी भरून आले. "माझ्यावर ही मंडळी का एवढे प्रेम करतात. समजत नाही" म्हणाले. दुसऱ्या दिवशी ३ एप्रिल १९६७ रोजी सकाळी तात्यासाहेब श्रीमहाराजांच्या चरणी विलीन झाले.

तीर्थरूप तात्यासाहेबांना जाऊन ५० ते ५५ वर्षे झाली. अजूनही त्यांची पद्मासन घातलेली, ताठ कणा असलेली, खांदे न झुकलेली शांत व प्रसन्न ध्यानमुद्रा डोळ्यासमोर येते आणि मन प्रसन्न होऊन जाते. पूर्व पुण्याई फळाला आली म्हणुन आम्हाला अशी संतसंगती मिळाली.

श्रीमहाराजांच्या चरणी अनन्यभावे शिरसाष्टांग नमस्कार!!

अरविंद काळे

विचार सुमने

# संत लक्षण आणि शरणागती

ह. भ. प. आनंदबुवा जोशी

संतांचिये पायी हा माझा विश्वास । सर्वभावे दास झालो त्यांचा ॥धृ॥
तेचि माझे हित करिती सकळ जेणे हा गोपाळ कृपा करी ॥१॥
भागलिया मज वाहतील कडे । त्यांचियाने जोडे सर्व सुख ॥२॥
तुका म्हणे शेष घेईन आवडी । वचन न मोडी बोलिले ते ॥३॥

जीव हा समाधानाचा भोक्ता आहे. त्यातल्या त्यात मनुष्यप्राणी जीवनात सर्व प्रयत्न समाधानासाठी करत असतो, अहर्निश प्रयत्न करून सुद्धा किती लोकांना समाधान मिळतं? तर त्याचे प्रमाण भगवद्गीतेने दिल आहे.

गीता सांगते,
मनुष्याणां सहस्रेषु कश्चित यतति सिद्धये।
यततामपी सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ।।

याचा अर्थ असा की जन्माला आलेल्या अनेक मनुष्यामध्ये एखादाच निरतिशय सुखाचा लाभ करून घेतो. पण इतर मनुष्याना अत्यंतिक समाधानाची ओढ असतेच. हे समाधान त्याला कसे मिळेल याचा विचार सनातन वैदिक धर्माच्या तत्वज्ञानाने वेद, उपनिषदे, श्रुती, स्मृती ह्याच्या द्वारे, अनेक संत सज्जनांनी आपल्या सद्ग्रंथाच्या द्वारे केलेला आहे. तुकाराम महाराजांचा हाच आशय असलेला अभंग चिंतनास घेतला आहे. तुकाराम महाराजांचा अधिकार सर्वश्रुत आहेच. ज्यांची वाणी वेदांतच बोलते. असे तुकाराम महाराजांनी अवलोकन केले की मनुष्याला निरतिशय समाधान हवे आहे. पण अनेक जन्म प्रयत्न करूनही ते मिळत नाही हे वास्तव आहे. मनुष्य हा श्रद्धायुक्त प्राणी आहे. म्हणून भगवद्गीता म्हणते.

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः। ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति।।

म्हणजे श्रद्धायुक्त अंत:करण हे मनुष्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. श्रद्धेला फळ तेव्हाच येते की जेव्हा श्रद्धा दृढ होते. श्रीमहाराजांच्या शब्दात हिमालयात बर्फ पडते. ते काही काळाने घन बनते इतके की बर्फ दगडासारखे कठीण होते. तशी श्रद्धा घट्ट झाली की निष्ठा बनते. अशी श्रद्धा निष्ठा कुठे असावी? ते संतानी सांगितले तिथेच असावी असं शास्त्र सांगते. निरतिशय आनंद अनुभवण्याची दोन साधने आहेत एक म्हणजे ते साधन संताणुचारीत असाव व ते साधन शास्त्रानुचारीत असाव.

तुकाराम महाराज म्हणतात मी संताच्या चरणावर विश्वास ठेवला हे स्पष्ट करताना पुढे म्हणाले, सर्वभावे दास झालो त्यांचा. याचाच अर्थ मी अनन्यभावाने त्यांना शरण गेलो. का शरण गेलो हे सांगताना म्हणतात माझे हीत काय? आणि अहित काय? हे मला काहीच कळत नाही व त्यामुळेच मी भगवंताच्या कृपेपासून वंचित राहतो. संताना शरण गेल्यामुळे माझं खरं हीत म्हणजे ''जीवो ब्रह्मैव नापर:'' या अवस्थेला मला ते आणून सोडतात व हीच माझ्यावर गोपालकृष्णाची

कृपा होय. भगवद्कृपा अथवा संतकृपा समजावून सांगताना नाथ भागवतात भगवान श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले,

ऐक माझ्या कृपेचे लक्षण। प्राप्त होता विषय जाण। न सुटे माझे अनुसंधान। या नाव मत् कृपा।।

तुकाराम महाराज म्हणाले, संताना शरण जायचं आणखी एक कारण म्हणजे परमार्थाची वाटचाल खडतर आहे. ती वाट चालताना साधक थकतो. आणि असे थकल्यानंतर त्याला संत अथवा सद्गुरू शिवाय कोणीही सावरून धरत नाही. तेच त्याला सांभाळतात हा मार्गाच मुळी श्रुती म्हणते

'क्षुरस्य धारा निशिता दुरुत्यया दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति।।' कठोपनिषद

मग अशा मार्गात सर्वार्थाने सांभाळणारे संत सत्पुरुष यांच्या चरणावर विश्वास ठेवायचा म्हणजे काय करायचे. ते पुढे तुकाराम महाराज सांगतात. 'तुका म्हणे शेष घेईन आवडी । वचन न मोडी बोलिले ते ।।' संतानी आपला देह सोडताना पंचतत्वापैकी एका तत्वाच्या माध्यमातून विलीन करताना ते आपल्याजवळ ज्या तीन रुपात राहतात त्यातले एक समाधीरूप, दुसरे कीर्तीरूप, व तिसरे ग्रंथरूप आहेत. सत्पुरुषांच्या ग्रंथातल एक अक्षर जीवाची चिद्ग्रंथी म्हणजे वासनेची गाठ सोडवते. म्हणून त्या शब्दावर विश्वास ठेऊन आपण साधनेची वाटचाल करावी

अभंगाचा थोड्क्यात हा अर्थ बघितला. आता दोन गोष्टीचे चिंतन करू. एक- असे संत असतात कसे? तर दुसर अशा संताना शरण कसे जावे? संताची तटस्थ लक्षणे आपल्याला माहित आहेत पण त्याचे स्वरूप लक्षण केवळ सद्ग्रंथातून आकलन होऊ शकते. भागवतकार या विषयी बोलताना म्हणतात.

संतो नपेक्षा मच्चीत्ता: प्रशान्ता: समदर्शिन:।
निर्ममा निरहंकारा निर्द्वंद्वा निष्परीग्रहा: ।।२७।।

याचा थोडक्यात विचार करूया

१.संताना कशाचीही अपेक्षा नसते कारण अपेक्षा ठेवली म्हणजे अपेक्षा पूर्ण न झाली तर वृथा अहंकार निर्माण होतो व ज्याच्या कडून अपेक्षा असेल त्याच्या विषयी द्वेष मत्सर निर्माण होतो. भाऊसाहेब केतकर निवृत्तीनंतर गोंदवल्यास येऊन राहिले तेव्हा त्यांचे मित्र वर्तक त्यांना भेटायला आले आणि म्हणाले तू इथे काय म्हणून राहिलास? तेव्हा भाऊसाहेब म्हणाले 'श्रीमहाराजांच्या तोंडून मी इतके वर्षात 'मला काही हवं' हे शब्द ऐकले नाहीत. अश्या थोर सत्पुरुषाच्या स्थानी आजही कुणाकडून कसलीही अपेक्षा दिसतच नाही.

२. संताच चित्त हे भगवंताशी तद्रूप झाल्याने ते निरपेक्ष तर असतातच पण सदा भगवंताबद्दल बोलत असतात. त्याच्याच स्मरणात असतात. भगवद्गीता म्हणते
'मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् । कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्तिच''
श्रीमहाराजांच चित्त सतत भगवंताच्या अनुसंधानातच असे. ह्याबद्दल कासेगावकर वैद्य यांच्या लेखात वर्णन दिसते. एक अष्टमांश लक्ष व्यवहारात तर सात अष्टमांश लक्ष त्याचे भगवंताकडे असे. ते कायम भगवंताबद्दल बोलत.

३. प्रशांत हे तिसरे लक्षण. भगवंताचे लक्षण सांगताना शांताकारम् असे सांगतात. कारण देहाला कधीतरी राग येतोच पण संताना 'प्रशांत' म्हणतात. प्रशांत म्हणजे प्रभावेन शांत:। म्हणून संताची शांती कधीच बिघडत नाही; कारण ती शांतीची पै शांती असते. पू. बाबा बेलसरे

निरुपणात सांगत श्रीमहाराजाना कोणीही कसाही आला तरी राग येत नसे व त्याची शांती ढळत नसे.

४. समदर्शन हे पुढचे लक्षण. समदर्शी म्हणजे सदा सर्वत्र सम असलेल्या आत्मस्वरूपाचे अखंड दर्शन घेणारे होत. श्रीमहाराज म्हणाले माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येका मध्ये मी रामच पाहिला. 'तुका म्हणे सांगू किती तेची भगवंताच्या मूर्ती'

५. निर्ममा आणि निरहंकारा हे लक्षण संताचे दिसतेच. भगवंताशिवाय इतर कसलीच आवड नाही म्हणून मोहही नाही. आणि कर्तेपण नाहीसे झाल्याने अहंकारही नाही. श्रीमहाराज म्हणाले ''मी करतो या शब्दांनी मी माझी जीभ कधी विटाळली नाही.

६. संताचे शेवटचे लक्षण सांगताना भागवतकार निष्परीग्रहा: असे सांगतात. म्हणजे संत कशाचाच परिग्रह करीत नाहीत. कुठलाही संग्रह माणसाला मोहात अडकवतोच. 'दाता एक रघुनंदन' अशी निष्ठाच असेल तर कशाला होईल. अशा संताना त्यांनी धारण केलेल्या तीन रूपापैकी एका रुपातून आपण त्यांना शरण जाऊ शकतो. आपल्याला नित्य शरण जाण्यासाठी उपलब्ध असलेले पहिले रूप ग्रंथरूप दुसरे कीर्तीरूप, व तिसरे समाधिरूप अशा समाधीचे दर्शन घेतले म्हणजे जीवाचा आकांत मिटून रामाकांताची गाठ पडते कारण –

समाधी पहाता समाधान होते। तनु कष्टवी त्यासि आनंद देते।
मनी भाविता कामना पूर्ण होती। नमस्कार त्या ब्रह्मचैतन्य मूर्ति ।।

**संताना, सद्गुरूंना शरण कसे जावे ?**

संताची भागवतात सांगितलेली काही लक्षणे आपण पहिली. भगवंतापासून मिळणारा अतींद्रिय आनंद असे संत अखंड भोगत असतात. सुखदु:खानी कधीच विचलित न होतं संत त्यांची शांती ढळू देत नाहीत. तर या उलट सामान्य माणूस चिंता काळजी आणि भय यांनी कायमच ग्रस्त झालेला असतो. देहाच्या कितीही सोयी सुविधा प्राप्त असून सुद्धा मनाला शांतीचा अनुभव नसतोच. तेव्हा आपल्या जीवनात शांती समाधनाचा अनुभव घेण्यासाठी त्याला संतांनाच शरण जावे लागते. हे शरण जाणे म्हणजे काय? किंवा कसे जावे हा प्रश्न येतो.

ही शरणागती येण्यासाठी हरिभक्ती विलास या ग्रंथात या शरणागतीची सहा अंगे दिली आहेत. त्याचे अनुकरण झाले तरच माणसाला शांत तृप्त व निर्भय जीवन जगता येते. ही सहा अंगे अशी:

**१.परमार्थाला शोभेल असं अनुकूल वळण आपल्या जीवनाला द्यावे.** असे अनुकूल वळण आधी संत सहवासात श्रवन केल्याने समजते व असा विवेक सतत जागृत ठेवण्यासाठी योग्य प्रयत्न करावे लागतात. संताच्या अंगी सदगुरू होण्याची पात्रता अपोआप निर्माण होते. व सदगुरू आपल्याकडे आलेल्यांचे अंतरंग बदलण्याचे म्हणजे दृश्यामध्ये गुंतलेल्या वासनेला ईश्वराकडे वळवण्याचे महत्कार्य करतात. पण त्याची या कार्यासाठी शिष्याने आपलं जीवनाचा घाट बदलावा लागतो. म्हणजे परमार्थासाठी अनुकूल बनवावा लागतो. जसे शिल्पकारकडे शिल्प घडविण्यासाठी स्थिर दगड असणे गरजेचे तसे संताना सद्गुरूंना अपेक्षित असे वागणे शिष्याकडून अपेक्षित असते. सात्विक आहार विहार हे बाह्यांगाचे नियम तर अंतरंगामध्ये सद्गुरूंनी सांगितलेली उपासना यथासांग करणे अत्यंत गरजेचे. परमार्थात भगवंताचे अखंड स्मरण हेच ध्येय असल्याने त्याचे स्मरण सतत राखण्याचा मनापासून प्रयत्न हेच खरे पहिले अंग होय. श्रीमहाराजही सोप्या शब्दात म्हणतात.

''ज्यामध्ये भगवंताची आठवण राहील तो विवेक समजून आचरणात आणावा.''

**२.प्रतिकूल ते टाळावे**

अनुकूल वर्तन व सद्गुरुनी सांगितलेले साधन हे औषध आणि पथ्य सांभाळण्यासारखे, तर साधनेला प्रतिकूल वर्तन टाळणे हे वर्ज्य पदार्थासारखे त्यागावे लागते. श्रीमहाराजांनी सांगितलेले टाळणे म्हणजे परनिंदा, परद्रव्य, आणि परस्त्री हे कटाक्षाने टाळणे होय. शिवाय दुसऱ्याचे मन दुखावणे म्हणजे हिंसाच होय दुसऱ्याचे मन दुखावणे म्हणजे भगवंताचे मन दुखावणेच. म्हणून दुसऱ्याचे अंतकरण सांभाळणे अत्यंत गरजेचे. तसेच विषयी व्यक्तीची संगत बाह्यांगाने टाळावे तर मनात येणारे कुविचारही प्रयत्नाने टाळावेत.

थोडक्यात सद्गुरूंना आवडणार नाही ते करूच नये. महाराजांच्या शब्दात 'ज्याच्यामध्ये भगवंताचा विसर पडेल त्याच्यावर वैराग्य करणे.' एक प्रसंगच स्पष्ट करेल की प्रतिकूल ते टाळणे किती गरजेचे. एकोणिसाव्या शतकातील घटना आहे. स्वामी दयानंद यांचा शिष्य सकाळची ध्यानधारणा आटपून मंदिराकडे जात असताना गर्दी दिसली त्याने जाऊन पहिले तर एक सैनिक व त्याची प्रेयसी दारूच्या नशेत असून त्यांनी लोकमर्यादा सोडली होती. त्या दृश्याचा परिणाम शिष्यावर झाला व त्याचे काही दिवस ध्यान जमेना. कारण ते दृश्यच डोळ्यासमोर येई. शेवटी स्वामिनी त्याला जवळ बसवून ध्यान लावून स्पर्श केला, तेव्हा त्याची मनस्थिती पूर्ववत झाली. साधनेत मन संवेदनशील होत जाते त्यावेळी दृश्याचा परिणाम त्वरित होऊ शकतो म्हणून विषयी लोकांची संगत शक्य तितकी टाळावी, कारण गेलेली सूक्ष्मता परत येण्यास कष्ट पडतात.

श्रीमहाराजांच्या सांगण्याप्रमाणे शरीर मन आणि भगवंत मिळून आपण तयार होतो. ज्याच्याशी मन चिकटते त्याचे गुणधर्म मनाला येतात म्हणून मनाने भगवंत भजायचा असेल तर अर्थात देह आणि देहाच्या अनुषंगाने भासणारे दृश्य जग यापासून मनाला सोडवणे गरजेचे. म्हणूनच विकार, वासना अहंकार या प्रतिकूल गोष्टी आहेत. ज्या मनाला भगवंतकडे जाण्यापासून रोखतात. म्हणून नीती धर्माची बंधने हा पाया आहे. तो घट्ट असेल तरच वरची इमारत पक्की होईल.

**३. रक्षणकर्ता केवळ एक सद्गुरूच आहे असा दृढ विश्वास.** श्रीमहाराजांच्या चरित्रात भवानरावची जी आठवण आहे ती म्हणजे सद्गुरूंवर ही निष्ठा कशी असावी याचे उत्तम उदाहरण आहे. सद्गुरूंच्या पाठींब्यावर संमंधाशी सुद्धा दोन हात करायला भवानराव मागे हटला नाही. सद्गुरू स्वत:च सांगतात की तुमच्या मागे पुढे मी आहे, तेव्हा त्यावर ठाम विश्वास असायलाच हवा तेव्हाच माणूस निश्चित होईल. श्रीमहाराजांची वचनच सांगतात,

१. ज्याला कुणाच्या आधाराची गरज नाही अशाचाच आपण आधार घ्यावा आणि असा भगवंतच असतो.

२. जो मला शरण आला त्याचे रक्षण करणे हे माझे काम आहे असेच रामाचे ब्रीद आहे जो त्याचा होऊन राहतो त्याची लाज रामाला असते. सर्व सत्ताधीश जर परमात्मा आहे आणि तो आपल्या सद्गुरूंचे अंत:कणच आहे, नव्हे आपले सद्गुरूच परमात्मा आहेत म्हणजे आपले जगणे त्याच्या सत्तेने चालले आहे असा विश्वास निर्माण झाला, सद्गुरूंच्या अस्तित्वाची भावना जागृत राहिली तर भक्तांच्या प्रपंचात गोष्टी व्यवहारदृष्ट्या चांगल्याच घडतील असे समजू नये; परंतु प्रत्येक घटनेत सद्गुरूंचा हात स्पष्ट दिसेल यात शंका नाही. त्या कारणाने काहीही घडले तरी भक्तांच्या मनाचा समतोल बिघडणार नाही.

विचार सुमने

**४. मला काही कळत नाही माझं कल्याण कशात आहे..** सामान्य माणसाला आपल्या कर्तेपणावर फार विश्वास असतो. आपल्या इच्छा आपण पूर्ण करू असेही वाटत असते; पण खरे तर आपले कल्याण कशात आहे हे आपल्याला कळत नाही ते सद्गुरूंनाच कळते असा भाव निर्माण व्हायला हवा. मनाला आतूनच असं वाटावं मला खरच काही कळत नाही. आता सद्गुरू सांगतील तेच मी करीन. ते आज्ञापालन करण्याचीच बुध्दी व्हावी म्हणून समर्थांनी आपण काय मागावं ते करुणाष्टकात सांगितलं.

युक्ती नाही विद्या नाही बुध्दी नाही विवेकता। नेणता भक्त मी तुझा बुद्धी दे रघूनायका।।

मला कळत नाही असा भाव ठेऊन सद्गुरुंकडे गेलं तरच कल्याण होत. कासेगावकर वैद्य आणि श्रीमहाराज चील्या न्हाव्याच्या घरी जात असता एका कोनाड्यात ठेवलेल्या दिव्याकडे पाहून श्रीमहाराज म्हणाले, 'शास्त्रीबुवा ही पणती कशी जळते' शास्त्रीबुवा लगेच म्हणाले, 'महाराज मला नाही कळत' तेव्हा श्रीमहाराज म्हणाले 'मला कळत नाही! हे मला खूप आवडत' अर्जुनाला सुद्धा श्रीकृष्ण म्हणालेच ना 'तू ज्ञानी असशील तर समाधानात राहा आणि तसा नसशील तर उगाच ज्ञानाच्या गोष्टी सांगू नकोस' थोडक्यात कोरी म्हणजे स्वच्छ बुद्धीने सद्गुरुंकडे जावं.

**५. समर्पण** – मी माझेपणाची जो पर्यंत धडपड जाणा तोपर्यंत नाही समाधान। सर्वस्वी वाहावे रामास अर्पण। हाच उपाय सांगती साधुजन ।।

**आपल्याला जे त्यांना सांगायचे आहे ते समोर उभे राहून त्यांच्या कानावर घालावे म्हणजे आपली जबाबदारी संपली.**

– श्री भाऊसाहेब केतकर

मग जे घडते ते घडण्यामध्ये त्यांचा हात असतो. असे वागण्यामध्ये शरणागती आहे.

---

**"अनन्यशरण व्हावे की ईश्वर दर्शन झालेच"**

**– श्रीब्रह्मचैतन्य**

---

काव्य सुमने

## महाराजांची आरती

जय देव जय सद्गुरू गोंदवलेकर । आलो शरण तुम्हाला भक्त पामर ॥धृ.॥
माणगंगा तीरी गोंदवले गांव । तेथे जन्मा आले श्री सद्गुरू राव ॥
तुमचे चरणी मिळतो भक्तांना ठाव । वाहातो नेहमी नाम भक्तीचा भाव ॥१॥
पाजूनीया अमृत रामनामाचे । उघडूनी दिधले द्वार मोक्षपदाचे ॥
निवारूनी दुःख अगणीत जनांचे । गर्जवीले जगी नाम रामाचे ॥२॥
जय देव जय सद्गुरू गोंदवलेकर । आलो शरण तुम्हाला भक्त पामर ॥धृ.॥

दीपक हरिभाऊ खानोलकर




# महाराजांसमान नाही त्रिभुवनी

महाराजांसमान नाही त्रिभुवनी,आनंदाची खाणी गुरूराय.असे आपण म्हणत असतो. श्रीमहाराज म्हणजे नाम, व नाम म्हणजे श्रीमहाराज अस एक छानसं सूत्रच आहे.नुसते "महाराज" अस म्हणू तर बघा चित्तवृत्ती किती बदलतात आणि एक ऊर्जेचा स्तोत आपल्याजवळच आहे हा अनुभव येतो.हे तर आता या क्षणाचं झाले..त्रिभुवनाचाच विचार करायचा झालं तर जाणवेल सगळं तत्व एका गोंदवल्यात साकार आहे. गोंदवले आपल माहेर, सुखधाम, मोक्षधाम सगळं काही आहे. त्यासाठी स्वर्ग, आकाश, पाताळ याठिकाणी वेगळे जाण्याची गरजच नाही. स्वर्गात सगळ आहेच पण या स्वर्गसुखासाठी आपल्याला नाम घ्यायचेच नाही. आपल्याला भय शिवतच नाही कारण आपल्या मागे अनेक पतितांचा उध्दार करणारे,उपेक्षितांच्या मागे उभे रहाणारे श्रीमहाराज आपल्या सोबतच आहेत. भूतलावर गोंदवले हे आपल्यासाठी स्वर्गच आहे.

आपले सद्गुरू हे चालत बोलत परब्रह्म आहेत ते गोंदवल्यात गेलं की जाणवतच. श्री ब्रम्हानंद महाराज म्हणायचे "दोन रूपयात चालत-बोलत परब्रह्म बघायला मिळते." सत्, चित् व आनंद असे सच्चिदानंद रूप गुरूपद म्हणजे श्रीमहाराज. त्यांची स्मृती ते नाम यात केवळ एका आनंदाशिवाय काही नाही म्हणूनच श्रीमहाराज "आनंदाची खाण" आहेत. आपण काळजी करू,असमाधानी असू तर या आनंदस्वरूपाला जाणता येणार नाही. आपल्या मुखी नाम आहे हाच श्रीमहाराजांच्या आनंद स्वरूपाचा अनुभव. तरी या अनुभवाची गणती करूच नये त्यामुळे आपले साधन कमी होईल. श्रीमहाराज आपल्याला गुरूपदी लाभले. गुरू हेच देव, गुरू हेच राम असे म्हणत आपलं मागणीच बंद व्हाव. आता काही नको अशी वृत्ती ठेवावी.

सर्व पंचमहाभूताची तत्वे म्हणजे श्रीमहाराज. गुरूतत्व हे आकाशापेक्षा देखील व्यापक आहे. महाराज म्हणजे अखंड प्रेम. श्रीमहाराज म्हणत "माझ्यातल प्रेम काढलं तर मी नाही". ज्याला गुरूंच्या जवळ जायचे त्याला अग्निदिव्यातून जावेच लागते. श्रीमहाराजांनी तर आपल्याला जवळ घेतलेच आहे. या अग्निपेक्षासुध्दा गुरूतत्व श्रेष्ठ आहे.

वायू म्हणजे चैतन्य..अखिल ब्रम्हांडांचे चैतन्य जे ब्रम्ह रूपात भूतलावर अवतरले ते "ब्रम्हचैतन्य". म्हणूनच श्रीमहाराज म्हणजे आनंदाची खाण असे आपले सद्गुरू, या गोंदवल्यात आहेत तर वेगळ्या मोक्षधामाची आपल्याला गरजच नाही.

सौ.निलिमा कुलकर्णी

काव्य सुमने

पाऊण सरले पाव उरले, मन काही मानेना
प्रपंचाच्या धांदलीत महाराज
मुखात नाम येईना ॥

चांगले ल्यावे, चांगले खावे
चांगले दिसावे चांगले असावे
इच्छा काही संपेना, प्रपंचाच्या धांदलीत
महाराज
मुखात नाम येईना ॥

अभिमान आहेच, क्रोध आहेच
द्वेष ईर्षा जसेच्या तसेच,
विकार काही आवरेना
प्रपंचाच्या धांदलीत महाराज
मुखात नाम येईना ॥

राम दाता, राम कर्ता, बुद्धीला हे पटते
सारे
अन्नदान आवडते तुम्हा ,पण देताना हात
आवरे
मी केले, मी दिले वृत्ती काही हटेना
प्रपंचाच्या धांदलीत महाराज
मुखात नाम येईना ॥

खूप वाटते नाम घ्यावे बैठक काही जमेना
सद्ग्रंथाचे वाचन व्हावे आळस तो ही
सरेना
काय साधले काय साधायचे हिशोब काही
लागेना
प्रपंचाच्या धांदलीत महाराज
मुखात नाम येईना ॥

महाराज आता एकच करा
पाश सर्व हे दूर सारा
शरण मी आले तुमच्या पायी
चरणाशी मज द्यावा थारा
प्रपंचाचा मोह सुटेना, लोभ काही आवरेना
प्रपंचाच्या धांदलीत महाराज मुखात नाम
येईना ॥

सौ हर्षदा हेमंत दातार

माझे महाराज माझे महाराज
संतांचा मेरुमणी माझे महाराज ॥

गीताईचा गणू तुकाईचा बाळ
ब्रह्मांडाचे नायक माझे महाराज ॥

मारुती अवतार आनंदाचा सागर
नामाचा गजर माझे महाराज ॥

शांतीचे आगर दिनांचा आधार
पतितांचा उद्धार माझे महाराज ॥

ब्रम्हानंद रामानंद आनंदसागर
प्रल्हादाचे प्राण माझे महाराज ॥

गोमतेचे रक्षण भक्तांचे भूषण
अविरत अन्नदान माझे महाराज ॥

जेथे जेथे नाम तेथे माझे प्राण
हे ब्रीद जाण माझे महाराज ॥

तुमच्या प्रसादे जीवन हे धन्य
दयासिंधु कृपासिंधु माझे महाराज ॥

सौ हर्षदा हेमंत दातार

॥ **माझे सदगुरू नाथ** ॥

माझे सद्गुरू नाथ
मुखी नामाची साथ ॥

माणगंगा तिरी स्वारी
नामाने भक्तांना तारी ॥

नामाची प्रचिती येतसे
भक्त आनंदी डोलतसे ॥

गुरूची आरती करावी
नामाची कास धरावी ॥

नाम हे प्राणाची खुण
वदती सद्गुरू जाण ॥

मनी न ठेवता भाव दुजा
करू गुरूची मानस पुजा ॥

चित्ती राखून अनुसंधान
गुरू चरणी राहू नमन ॥

साईप्रसाद संजय बोभाटे

# श्री बापूसाहेब कुळकर्णी



नागपूर विभागातील श्रेष्ठ साधक श्री.पुंडलीकराव कुळकर्णी यांचे जेष्ठ सुपुत्र आणि माझे थोरले बंधु श्री जनार्दन उर्फ बापूसाहेब कुळकर्णी यांना वयाच्या एकोणीसाव्या वर्षी श्री.महाराजांच्या वाणी अविष्कारात अनुग्रह प्राप्त झाला तेव्हा पासून जेव्हा वेळ मिळेल तेव्हा, जसे जमेल तसे ते नियमाने श्रीक्षेत्र गोंदवले आणि मालाड येथे जाऊ लागले. वडील श्री.पुंडलीकराव आणि आई सौ.इंदिराबाई यांचा महाराज प्रेमाचा, नामसाधनेचा आणि गुरु सेवेचा वारसा त्यांनी जीवनभर जपला.

आपल्या नोकरीतील अधिकारपदाची जवाबदारी सांभाळून आणि पुढे निवृत्ती नंतर गोंदवले येथील पुण्यतिथी उत्सवात ते देणगी विभागात सेवारत राहिले. सुमारे २५ वर्षाच्या दीर्घकालामधे सेवेचे हे व्रत त्यांनी अखंडपणे आणि शेवटच्या श्वासापर्यंत चालू ठेवले.

नागपूर येथे १९६३ सालापासून सुरु असलेल्या उपासनेमधे त्यांचा सक्रीय सहभाग सर्वांना आदर्शरूप होता. श्री. पुंडलीकरावांनी १९८८ मध्ये देह ठेवल्यानंतर श्री. बापूसाहेबांनी नागपूर येथील उपासनेचे, उत्सवांचे, शिबिरांचे नेतृत्व अत्यंत यशस्वी रीतीने सांभाळले. येथील सर्व कार्याचे ते मुख्य आधारस्तंभ होते.

सन २०१४ मध्ये संपन्न झालेल्या पुण्यतिथी उत्सवामध्ये आपली अखेरची सेवा श्रीमहाराजांचे चरणी अर्पण करून ते नागपूरला परत आले आणि एक महिन्याच्या कालावधीत १७ जानेवारी २०१५ मध्ये श्रीचरणी विलीन झाले. आपल्या तीनही धाकट्या बंधूंवर (वासुदेव, दत्तात्रय व गोविंद) त्यांचे पुत्रवत प्रेम होते. महाराजांच्या अनेक भक्तांना त्यांच्या सुख दुःखाच्या प्रसंगी श्री बापूसाहेबांचे मार्गदर्शन लाभले. आजही त्यांच्या दिव्यस्मृतींनी नागपूर येथील भक्त भावविभोर होतात.

त्यांच्या स्मृतीला अनंत अनंत प्रणाम.

वासुदेव कुळकर्णी

# श्री कृष्णकांत देसाई



माझे वडील, कै. श्री. कृष्णकुमार (अशोक) नारायण देसाई यांचे १७-मे-२०२० रोजी वयाच्या ६९ व्या वर्षी, श्री महाराजांच्या चरणी निधन झाले. वयाच्या १६-१७ व्या वर्षी, आजोबा माझ्या वडिलांना ती. बाबा बेलसरे ह्यांच्याकडे घेऊन गेले आणि तिथेच श्री महाराजांचा माझ्या वडिलांच्या जीवनात प्रवेश झाला. बाबांच्या अमूल्य मार्गदर्शनामुळे वडिलांचा प्रपंच नीटनेटका तर झालाच वर बाबांच्या प्रभावामुळे त्यांच्या आध्यात्मिक ओढीत प्रचंड वाढ झाली आणि ते महाराजांना आणि नामस्मरणाला कायमचे चिकटले.

त्यांचा स्वभाव विनोदी होता. ते सतत हसत आणि हसवत असत. अगदी आयसीयू मधे असतानाही भेटायला येणाऱ्यांशी ते विनोद करत असत. ते उत्तम कविता करत, छान गाणे म्हणत, त्यांना चित्रकलेची सुद्धा आवड होती. त्यांचा वाचनाचा आणि लिखाणाचा जबरदस्त व्यासंग होता. त्यांनी चार कवितासंग्रह प्रकाशित केले आणि अनेक लेखही लिहिले. तसेच त्यांनी महाराजांची आणि बाबांची अनेक चित्रे देखील काढली. ह्या सगळ्या आवडी, बाबांच्या सहवासाने हळू हळू महाराजमय बनल्या.

आयुष्याच्या शेवटी, त्यांना किडनी विकाराने त्रस्त केले होते, त्यात बोन टी.बी. झाल्यामुळे चालणं जवळपास बंद झालं होतं. भरीस भर म्हणून कोविड काळात बाकीचे सगळे व्यवहार ठप्प झाले आणि डायलिसीसला सुद्धा Ambulance ने झोपून ने-आण करावी लागत असे. त्यातच, १७ मे रोजी संध्याकाळी त्यांना श्वास लागला. आम्ही लगेच Ambulance बोलावली. हे अस श्वास लागण आणि Emergency dialysis नंतर लगेच परत घरी येण, अस आधीही २-३ वेळ झालं असल्यामुळे आम्हाला तसे फारसे गंभीर वाटले नाही पण वडील खुणेनेच Ambulance नको असे म्हणाले आणि माझ्या आईचा आणि माझा हात धरून ठेवला. आम्हा दोघांनाही जाणवलं की हे काहीतरी वेगळं आहे. आम्ही दोघांनी वैखरीने तेरा अक्षरी मंत्राचा जप चालू केला. Ambulance दरात येऊन ठेपली आणि इकडे वडिलांनी नामस्मरणात देह ठेवला. कोविड काळ असल्यामुळे, कोणतेही धार्मिक विधी न करता फक्त एका मित्राच्या उपस्थितीत पुढचे कार्य कसेबसे पार पडले. पण वडिलांच्या शेवटच्या घटकेपपासून, पहाटे कार्य उरके पर्यंत, पदोपदी महाराजांचे अस्तित्व जाणवले, प्रत्येक अडचणीत पूर्ण लॉकडाउन असतानासुद्धा कोणीतरी मदतीला धावून येत होतं. महाराजांनी चरित्रात सांगितल्याप्रमाणे, वडिलांचा शेवटचा श्वास नामात गेला आणि महाराज 'अंतकाळ साधतात' म्हणजे काय याच्या प्रत्यय आम्हाला आला.

श्री. गौरव देसाई

# श्री विलास गोविंद सरवटे



आपल्याला श्री महाराजांच्या तसबिरीमध्ये त्यांच्या गळ्यातला जो पुष्पहार दिसतो, त्यातील एक सुवासिक, कोमल, शुभ्र फूल म्हणजे कै.वि. गो. सरवटे. श्री महाराजांचे ते निस्सीम भक्त होते. त्यांचा जन्म २०जानेवारी १९५१ रोजी झाला. कोल्हापूर जवळ असलेले असुर्ले (ता.पन्हाळा) हे त्यांचे मूळ गाव. विद्यापीठ हायस्कूल कोल्हापूर येथे मॅट्रिक पर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले. शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर येथून मेकॅनिकल इंजिनियरिंगचा डिप्लोमा त्यांनी प्राप्त केला. वडिलांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आली. १९७८ पासून महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळात ते नोकरी करू लागले २००२ साली झोनल मॅनेजर या पदावरून त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. या नोकरीच्या काळात मुंबई, पुणे, नाशिक, नांदेड, उस्मानाबाद व सोलापूर या ठिकाणी त्यांचे वास्तव्य झाले. निव्वळ नामस्मरण व साधना करण्यासाठी त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. १९८१ पासून त्यांनी कोल्हापूरच्या आपल्या घरी श्री.महाराजांचा जन्मोत्सव सुरू केला, तो आजही सुरू आहे. ४ ऑक्टोबर २०२१ रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले.

अखंड नामस्मरण आणि श्री गोंदवलेकर महाराजांचे व त्यांच्या शिष्यपरंपरेतील सर्वांचे वाङमय बारकाईने, सातत्याने वाचून त्याचे मनन व चिंतन करणे हा सरवटे यांचा ध्यास होता. स्वत:ला माहीत असलेले इतरांना तळमळीने सांगणे आणि तितकेच उत्सुकतेने दुसऱ्याचे ऐकून घेणे हा त्यांचा गुणविशेष होता. निरहंकारिता, अगत्यशीलता आणि स्वभावातील व वागण्यातील आत्यंतिक मृदुता ही त्यांची वैशिष्ट्ये होती. मृदु आवाजात अत्यंत जिव्हाळ्याने ते श्री महाराजांविषयी बोलत असत. श्री महाराजांविषयी अपरंपार निष्ठा असल्यामुळे ते चट्कन इतरांशी जोडले जात. त्यांच्या वागण्या-बोलण्यातून श्री महारांविषयीचे प्रेम, आदर आणि आपलेपणा सदैव प्रकट होत असे. त्यामुळे समोरची व्यक्ती प्रभावित होत असे.

श्री महाराजांचा माणूस संसारी असला तरी त्याचा संसार व नोकरी ही दोन्हीही कशी परमार्थाने उजळून निघालेली असतात याचे ते मूर्तिमंत उदाहरणच होते. सद्‌गुरूनिष्ठा व आज्ञापालन हाच त्यांच्या जीवनाचा पाया होता. श्री महाराजांचा आधार हाच एकमेव आधार, असे मानून प्रपंचातल्या अनुकूल/प्रतिकूल परिस्थितीला हसतमुखाने सामोरी जाणारी माणसे खरोखरच विरळा असतात. कै.सरवटे हे अशा वृत्तीचे होते.

सौ.मंजिरी पांडे (नांदेड)

# श्री बाळकृष्ण (विजय) भा. लिक्ते



माझ्या बालपणापासून बाबांची व्यक्तिरेखा ही शिस्तप्रिय तरीही प्रेमळ, हसतमुख आणि टापटीप. त्यांना व्यवस्थितपणा अतिशय प्रिय. घरी आई -बाबा, आजी-आजोबा, मी, रामालय आणि श्री महाराज असे आमचे कुटुंब. लहानपणापासूनच 'राम घ्यावा राम गावा राम जिवाचा विसावा' असा बाळकडू बाबांना मिळाला होता. आजी बरोबर बाबा लहानपणी कायमच पुण्यतिथी उत्सवात गोंदवल्याला जायचे.

आमच्या घरी पुण्यात लिक्ते राम मंदिराची पायाभरणी श्री.सदगुरू महाराजांच्या आज्ञेनुसार झाली आणि श्रीसदगुरू ब्रह्मानंद महाराजांनी स्थापना केली. दोन श्रीसदगुरूंचा आशिर्वाद आम्हाला लाभला. आजी सांगायची त्याप्रमाणे महाराजांचे पुणे मुक्कामी असले की घरी येणे असे. गोडाचा स्वयंपाक करून सर्वांना प्रसाद दिला जाई. श्रीमहाराजांना दाण्याची उसळ खूप आवडायची. त्याचा प्रसाद ते स्वतःच्या हाताने सर्वांना वाटत. श्रीमहाराजांच्या खडावा (पादुका) आजही पूजेत आहेत. यावर्षी १०९ वर्षे स्थापनेला पूर्ण झाली.

बाबांचे शालेय शिक्षण भावे हायस्कूल, पुणे येथून झाले तर महाविद्यालयीन शिक्षण BMCC कॉलेज मधून झाले. नोकरीनिमित्त बाहेरगावी बदली व्हायची पण आई घराची जबाबदारी तसेच सालाबादाप्रमाणे घरी होणारे, श्री. महाराजांची पुण्यतिथी, जन्मोत्सव, रामनवमी, गुरुपौर्णिमा, रविवार उपासना आनंदाने पार पाडायची. बाबांनी त्यांची कीर्तनाची आवड प्रत्यक्षात आणली. स्पष्ट उच्चार, खडा आवाज आणि गायन सेवा ह्या अंगभूत गुणांबरोबर कीर्तनाचे धडे अतिशय उत्तम घेऊन नारद मंदिर कीर्तन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला होता. रामाची, मंदिराची सेवा अतिशय निस्सीमपणे केली. त्याच बरोबर पुण्यातील रविवार उपासना आरती मंडळाचे ते ट्रस्टी होते. त्यातील कार्यक्रमाचे नियोजन, मांडणी, ह्यामध्ये सक्रीय सहभाग होता.

माझे लग्न झाल्यावर आणि त्यांच्या निवृत्तीनंतर गोंदवल्यात सेवा करायची त्यांची इच्छा होती त्याप्रमाणे दामले काकांनी सांगितल्याप्रमाणे पुण्यतिथी उत्सवात १० दिवस ब्रह्मानंद हॉल आणि आईसाहेब हॉल येथे होणाऱ्या कार्यक्रमांच्या नियोजनाची व्यवस्था त्यांच्याकडे व श्री जोशी काका यांच्याकडे असायची. अतिशय चोखपणे ते पार पाडायचे. त्यासाठी देवदिवाळी पासूनच बाबा गोंदवल्यात असायचे. कधीही कुठे ट्रीप केल्या नाहीत पण रामाची सेवा ह्यातच आनंद मानला. त्यांचा अंतकाळ महाराजांनी साधला असावा म्हणूनच अत्यंत अल्पशा आजाराने आणि फारश्या यातना न होता २२ एप्रिल २०२१,चैत्र शुद्ध दशमी (राम नवमी साजरी करून) श्रीराम चरणी विलीन झाले.

कोटी कोटी प्रणाम !

महेंद्र बा.लिक्ते



# जुना कोळीवाडा राममंदिर श्रीब्रह्मचैतन्य उपासना केंद्र अर्नाळा

श्रींची उपासना केंद्रे

विरार रेल्वे स्टेशन पासून सुमारे आठ ते दहा किलोमीटरवर अर्नाळा नावाचे कोळी समाजाचे एक गाव आहे. कोळी समाजाची श्रीरामावरती नितांत श्रद्धा आणि भक्ती असल्यामुळे पूर्वजांनी सुंदर आणि भव्य असे श्रीरामाचे मंदिर बांधून ठेवलेले आहे. या मंदिरामध्ये दरवर्षी रामनवमीचा उत्सव दहा दिवस आणि हनुमान जयंतीचा उत्सव एक दिवस अतिशय मोठ्या प्रमाणामध्ये चालतो रामनवमीच्या दिवशी रामरायाची पालखी मधून भव्य मिरवणूक यात्रा काढली जाते.

साधारणतः अंदाजे २००७ किंवा २००८ साली या कोळीवाड्याच्या राम मंदिरामध्ये श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या कृपेने पुण्याचे राष्ट्रीय कीर्तनकार पुरुषोत्तम बुवा कुलकर्णी राम नवमीच्या उत्सवाकरिता या जुना कोळीवाड्याच्या राम मंदिरामध्ये कीर्तनाकरता आले होते दहा दिवस कीर्तन सेवा होती, कीर्तन करत असताना तेथील परिस्थिती बघितल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आलं की या मंदिरामध्ये रामाची धड पूजा सुद्धा होत नाही, वनवासातल्या रामाप्रमाणे हा ही राम वनवासामध्ये आहे अशीच परिस्थिती दिसत होती. मात्र कोळी समाजाची, कोळी बांधवाची रामावर नितांत श्रद्धा, प्रेम, असल्यामुळे त्यांच्या पूर्वजांनी भव्य मंदिर बांधलेल होत, भव्य राम मंदिरात मूर्ती ही अतिशय देखण्या, उत्कृष्ट आणि पाहता क्षणीच प्रेमात पडावे अशा त्या मूर्ती आहेत, परंतु प्रत्यक्ष प्रभू रामचंद्र ज्याप्रमाणे १४ वर्षे वनवासामध्ये होते, त्यांना ज्या प्रमाणे वनवास भोगावा लागला, तीच अवस्था इथल्याही रामाची होती. एक रामनवमीचा उत्सव सोडला तर वर्षभर त्या मंदिरात कोणीही फिरकत नव्हते. परंतु त्या मंदिरात दहा दिवस मोठ्या संख्येने व उत्साहाने रामनवमीचा जन्म काळाचा उत्सव व्हायचा, कीर्तनाला उदंड प्रतिसाद असायचा, कीर्तनाला श्रोत्यांची भरपूर गर्दी व्हायची, त्या दहा दिवसाच्या उत्सवामध्ये असे लक्षात आले मंदिरात उपासना होत नाही उपासना सातत्याने व्हायला पाहिजे मूर्तींच्या चेहऱ्यावरती उपासनेच तेज दिसून येते, ते तेज, ते चैतन्य निर्माण व्हावं म्हणून उपासनेबाबत बुवांनी प्रबोधन करण्यास सुरुवात केली, की

श्रींची उपासना केंद्रे



आपल्या पूर्वजांनी जी मंदिरे बांधली आहेत त्या मंदिरामध्ये उपासना झाली पाहिजे,

उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेविण
निराश्रयो । कितीही केला तरी जयो ।
कल्पांती नाही ॥ श्रीराम !

हे समर्थ वचन वारंवार समाजाला सांगून समाजाला उपासने करता प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही कुलकर्णी बुवांनी आपले प्रयत्न सोडले नाहीत पुढच्या वर्षी पुन्हा पुन्हा तोच उपदेश करून लोकांना उपासने करता प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला त्यांनी श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचे चरित्र सांगून रामनामाचे महत्व, प्रभाव सांगुन प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या वर्षी त्याचा थोडासा परिणाम झाला, मात्र तिसऱ्या वर्षी काही तरुण मुलांनी मनावर घेतलं की आम्ही उपासना करू, मग ही उपासना कशी करायची? उपासना म्हणजे काय म्हणायचे? रामनामाचा जप कसा व कशा पद्धतीने करावा? वगैरे प्रश्न मुलांनी विचारले, त्यानुसार कुलकर्णी बुवांनी त्यांना मार्गदर्शन केलं, किमान आठवड्यातून एक दिवस तरी सर्वांनी एकत्र बसून श्रीराम जय राम जय जय राम या तारक मंत्राचा जप केला तर उपासनेची गोडी निर्माण होईल, त्याप्रमाणे त्यावर्षीच्या रामनवमीच्या दिवशी १३ कोटी रामनामाचा संकल्प त्या ठिकाणी केला गेला. श्रीमहाराजांच्या कृपेने जपाला सुरुवात झाली, काही दिवस ५०ते ६० साधकांची उपस्थिती त्या ठिकाणी होती, हळूहळू उपासकांची संख्या वाढू लागली, आठवड्यातून एक दिवस म्हणजे दर गुरुवारी राम मंदिरात उपासना सुरू झाली. काही लोकांच्या घरी सुद्धा उपासना सुरू झाली उपासनेची या कोळी लोकांना एवढी गोडी निर्माण झाली की अवघ्या आठ महिन्यांमध्ये १३ कोटी पेक्षा सुद्धा जास्ती रामनामाचा जप या मंडळींकडून झाला, मंदिराला उपासना केंद्राचे स्वरूप आले आणि सातत्याने अखंड उपासना सुरू झाली, आजही मोठ्या प्रमाणात गोंदावल्यामध्ये सकाळी नऊ ते अकरा जी उपासना चालते तिच उपासना इथे चालू आहे.

उपासनेमध्ये एक पहिली माळ वैखरी वाणीने घेतली जाते, एक तास बसून तिथे श्रीराम जय राम जय जप राम वैखरी वाणीने जप करून जपसंख्या लिहिली जायची आणि त्यानंतर हाची सुबोध गुरूंचा, आणि रामपाठ सामूहिकरीत्या म्हंटले जायचे, नंतर त्या दिवसाचे किंवा त्या तारखेचे श्री महाराजांचे प्रवचन वाचले जायचे, त्यानंतरच्या रामनवमीच्या उत्सवाला पुन्हा कुलकर्णी बुवांनी या मंडळींना सांगितले की आपण एक वर्षभर जप करण्याचा श्रीमहाराजांकडे संकल्प केल्याप्रमाणे एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर रामा नामाचा स्वाहाकार करून १३ कोटीची सांगता करू या. स्वाहाकार कसा करायचा त्याची माहिती बैठक घेऊन सगळ्यांना माहिती सांगितली, महाराजांचे एक तत्त्व होतं की कोणालाही



काहीही मागायचं नाही, आणि तेच तत्त्व सगळ्यांनी पाळलं पाहिजे. म्हणजे कोणाला काहीही मागायचं नाही. भाव ठेवा रामापायी कोणा मागू नका काही हे महाराजांचे तत्त्व, महाराजांची शिकवण सगळ्यांना सांगितली त्यामुळे आम्ही कोणालाही काहीही मागायला गेलो नाही.

स्वतः कुलकर्णी बुवा यांनी नियोजन केल्याप्रमाणे उत्तम प्रकारचे वैदिक ब्राह्मण पुण्यातून आणले होते, नियोजन केल्याप्रमाणे पाच कुंड त्या ठिकाणी तयार करण्यात आले होते भव्य मांडव घालण्यात आला होता परिसरातील पंचक्रोशितील मंडळींना निमंत्रित करण्यात आले होते आणि संपूर्ण वर्षभर ज्या ज्या मंडळींनी श्रीराम नामाचा जप केला होता त्या सर्व मंडळींना स्वाहाकाराला बसवून त्यांच्याकडून स्वाहाकार करून घेण्यात आला.



ही सर्व श्रीमहाराजांचीच कृपा आणि त्यांच्या कृपेनेच हा आनंद सोहळा पार पडला. या स्वाहा काराकरिता आरणी मंथन करून अग्नी प्रगट करण्यात आला, नामाचा जयघोष चालू होता अग्नी प्रज्वलित करून तीन हा दिवसाचा सोहळा भजन, किर्तन प्रवचन आणि नामस्मरणाने उत्साहाने पार पडला, मुक्तकंठाने मुक्तहस्ते सगळ्यांना श्रीमहाराजांना अत्यंत प्रिय असणारे अन्नदान भोजन प्रसाद सगळ्यांना दिला गेला, आणि हा अलौकिक आनंद सोहळा श्रीमहाराजांनी करून घेतला, श्रीमहाराजांचे अस्तित्व तिथे जाणवत होते, श्रीमहाराजांची शिकवण होती की ज्या उत्सवाकरता जो पैसा मिळाला असेल ते द्रव्य त्याच गावात त्याच कामाकरता तो पैसा खर्च झाला पाहिजे हे जे श्रीमहाराजांचे तत्व आहे ते तंतोतंत पाळले गेले. सगळ्यांना स्वाहाकार संपल्यानंतर एकत्र बसवून हिशोब केला गेला आणि तिथे जे दान आले होते, त्याचा विनियोग सगळ्यांना त्यांची त्यांची दक्षिणा दिली गेली वाण्याचे पैसे दिले गेले, मांडववाल्याचे पैसे दिले गेले, माईक म्हणजे स्पीकरवाल्याचे पैसे दिले गेले आणि हे सगळे देऊन झाल्यावर ९६ हजार रुपये शिल्लक राहिले ते त्याच राम मंदिराच्या ट्रस्टीकडे सुपुर्त करण्यात आले आणि याचा विनियोग तुम्ही मंदिराकरता उपासनेकरता करा अशी विनंती केली.

या स्वाहाकाराकरिता राममंदिर ट्रस्ट कडून एकही रुपया घेतला नव्हता. त्यांनीही आम्ही काहीही देणार नाही असे स्पष्ट सांगितलं होतं. पण आम्ही फक्त त्यांचं मंदिर त्या ठिकाणी मागितलं आणि त्या पद्धतीने मंदिरामध्ये स्वाहाकार झाला त्यामुळे आसपासच्या संपूर्ण परिसरामध्ये एक प्रकारचे आनंदी वातावरण निर्माण झाले होते आणि रामनामाची गोडी सगळ्यांना निर्माण झालेली होती आणि त्यामुळे या मंदिरातून उपासना सुरू झाली गोंदवल्यामधून उपासनेची पुस्तकं आणि माळा आणल्या गेल्या राममंदिरामध्ये दर



श्री रामनामाच्या १३ कोटी जपाची अभूतपूर्व सांगता...

हजारो रामभक्तांच्या उपस्थित सोहळा संपन्न

श्री राम जय राम जय जय राम हा कायाकल्प करणारा तेरा अक्षरी दिव्य मंत्र. महर्षि नारद मुनींनी दिलेल्या या मंत्रामुळे वाटमारी करुन उपजिविका करणाऱ्या वाल्या कोळ्याचा कायाकल्प होऊन रामायण सारखे महाकाव्य लिहिणाऱ्या वाल्मीकी ऋषिंमध्ये रुपांतर झाले. देहसुख, पैसा, प्रतिष्ठा यांनाच सुखाची साधने मानून जगणाऱ्या सामान्य माणसांना ऐहिक सुखांचा लाभ होऊनही ती असमाधानी, अतृप्त, अशांत राहतात. मानवी जीवनांतील सर्व दुःखांचे मुळ, स्वरुपाच्या अज्ञानामध्ये आहे. म्हणूनच आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी निष्काम

उपासना हा सर्वोत्तम मार्ग श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी दाखविला...

आत्मसाक्षात्कार होण्यासाठी पुस्तकीज्ञानाची

आशिर्वादाने ह.भ.प.श्री.पुरुषोत्तमबुवा कुलकर्णी यांच्या पुढाकाराने श्री राम मंदिर, जुना कोळीवाडा-अर्नाळा येथे दिनांक १२ एप्रिल २०११, श्री रामनवमीच्या दिवशी उपस्थित सर्व रामभक्तांनी वर्षभरात तेरा कोटी श्री रामनामाचा जप पूर्ण करण्याचा संकल्प केला होता. त्या जपाची सांगता ह्याच मंदिरात अभूतपूर्व गर्दीत मोठ्या उत्साहात झाली. एकुण अठरा कोटींचा जप करण्यात आला...

या प्रसंगी श्री रामनाम स्वाहाकार पंचकुंडी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. सूर्योदयावेळी अनादी काळापासून प्रचलीत घर्षण पद्धतीने अग्नी प्रज्वलीत करण्यात आला व त्या

गुरुवारी सकाळी ९ ते १० उपासना चालते जवळजवळ २५० ते ३०० साधक स्त्री पुरुष या ठिकाणी उपासनेला बसतात. एवढेच नव्हे तर हळूहळू गोंदवल्याकडे सुद्धा त्यांचा ओढा निर्माण झाला आणि जवळजवळ अर्नाळा गावातील ८० टक्के लोकांनी गोंदावल्यामध्ये येऊन श्रीमहाराजांचा रामनामाचा अनुग्रह घेतलेला आहे आणि सातत्याने ते जप करतात. आजही याच पद्धतीने दर गुरुवारी उपासना चालू आहे. ज्या ज्या वेळेस गोंदावल्यामध्ये बोलावले जाते त्या त्या वेळेस मंडळी जाऊन तिथे सेवा करतात. संपूर्ण उपासना वाढवण्याचं कार्य उपासनेचे स्वरूप वाढवण्याचं कार्य लोकांच्या मनामध्ये गोडी निर्माण करण्याचं कार्य प्रामुख्याने श्री भुषण म्हात्रे व सौ. गौरीताई मुसळे या दोघांनी उल्लेखनीय काम केलेलं आहे, एक रुपया सुद्धा या उपासनेमध्ये घेतला जात नाही. उपासना चालवण्याचे कार्य सध्या नयना व कविता करीत आहेत, त्यांनी तिथे आणखी काही मुली तयार केलेल्या आहेत. उपासना केंद्रामध्ये श्रीमहाराजांचा फोटो आहे, समर्थ रामदास स्वामींचा फोटो आहे त्यांची उपासना चालते महाराजांची जयंती आहे, पुण्यतिथी आहे, गुरुपौर्णिमा आहे यासारखे जे काही उत्सव चालतात ते मंदिर कमिटीच्या मार्फतच केले जातात. तिथे आलेला जो पैसा आहे दक्षिणा आहे लोकांनी ठेवलेले जे काही तिथे महाराजांच्यासमोर आर्थिक स्वरूपामध्ये येते त्याचा विनियोग देवस्थान कमिटी करते. उपासना केंद्राकडे त्याचा कुठलाही पैशाचा संबंध ठेवलेला नाही. फक्त महाराजांचे एकच तत्व चालवलेले आहे ते म्हणजे - श्रीराम जय राम जय जय राम नामाचा जप करणे आणि उपासना करणे. व त्यामुळे अनेक लोक सदाचरण वा रामनामाला लागले आहेत.

श्रीराम समर्थ



श्रीमहाराज
उपदेशामृत

# सार सार सार राम जपे वारंवार

श्रीसद्गुरवेनमः ॥ जानकी जीवन स्मरण जयजय राम ॥ काया आणि वाचा यास दुर्विष यांचा विटाळ होऊ देऊं नये ॥ शांती, नम्रता सोडू नये ॥ नामस्मरण विसरूं नये ॥ विवेकें मनोजय करावा ॥ नाम घेतां वासना वृत्ती न उठे ॥ ऐसें साधन पूर्ण अभ्यासावें ॥ मग सुखे रामाशीं ध्यावें ॥ नाम सोडून जाय मन ॥ तेचि जाणावे पंच विषय ॥ षड्रिपूतीत वासने आधीन न होतां दृश्यातीत म्हणजे दृश्याला द्रष्टा न होतां स्वरूपी साक्षी म्हणजे समर्थांनीं जें सांगीतले ते न विसंबणें ॥ आणि विपयाकार अंत:करण होऊ देऊं नये ॥ मुक्तास जीवही नाहीं आणि आत्माही नाहीं ॥ तर कोणाला आहे? बद्धाला ॥ मुक्ताला क्रिया आहे ॥ जय जय रघुवीर समर्थ ॥ श्रीराम ॥

– ज्ञानोपदेश

चैतन्योपासना, श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज संस्थान द्वारा प्रकाशित, एप्रिल २०२४